महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**कालमर्यादा/अतितात्काळ**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/२०२२/९९५
दिनांक : 03 MAR 2022

प्रति,

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग पुणे)

**विषय : विधानपरिषद सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील लक्षवेधी सुचना क्र.४३ च्या अनुषगांने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत**

**संदर्भ :** १. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक लवेसू २०२२/प्र.क्र.७०/विशि-३ दि.०३.०३.२०२२
२. संचालनालयाचे पत्र क्र २अ/एडीएम/विपस/लक्षवेधी सुचना/८४ दि.०३/०३/२०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सुचना क्रमांक ४३ उपस्थित करण्यात आली आहे. त्याबाबतचे संदर्भाधीन पत्र सोबत जोडण्यात आले आहे त्याचे कृपया अवलोकन करावे. लक्षवेक्षी सुचनेमध्ये विचारणा करण्यात आलेल्या बाबींसदर्भाने संचालनालयाचे दि. १०.०८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या मुद्दयास अनुसरुन आपल्या संस्थेतील किती विदयार्थ्यांना शुल्कमाफी देण्यात आली आहे याची माहीती आज रोजी ०५:०० वाजेपर्यत **https://forms.gle/FMWvW8hLKCNGxvog8** GOOGLE FORM मध्ये भरावी.

जेणेकरुन सदरची माहिती संचालनालयास सादर करणे शक्य होईल.

सोबत :- वरीलप्रमाणे

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई
२.. प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/वि प स/लक्षवेधी सूचना/ ८४ दिनांक : 3 MAR 2022

अतितात्काळ

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर

विषय:-विधानपरिषद सन २०२२ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील लक्षवेधी सुचना क्र.४३ च्या अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक लवेसू २०२२/प्र.क्र.७०/विशि-३, दिनांक ३.३.२०२२

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सुचना क्रमांक ४३ उपस्थित करण्यात आली आहे. त्याबाबतचे संदर्भाधीन पत्र सोबत जोडण्यात आले आहे त्याचे कृपया अवलोकन करावे.लक्षवेधी सुचनेमध्ये विचारणा करण्यात आलेल्या बाबींसंदर्भाने संचालनालयाने दिनांक १०.८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविलेल्या मुद्दयास अनुसरून आपल्या विभागातील किती विद्यार्थ्यांना शुल्क माफी देण्यात आली आहे याची माहिती उलटटपाली संचालनालयास अवगत करण्यात यावी ही विनंती.

आपला,

(डॉ.गोविंद संगवई)
सहाय्यक संचालक,तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य मुंबई

लक्षवेधी सूचना
अति तात्काळ

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२

दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : archana.sawardekar@nic.in

---

क्रमांक: लवेसू-२०२२/प्र.क्र. ७०/विशि-३ दिनांक :- ३ मार्च, २०२२.

प्रति

१) संचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य. पुणे.

२) संचालक,
तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३) संचालक,
कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**विषय -** श्री. राजहंस सिंह, विधानपरिषद सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानपरिषद नियम क्र. १०१ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ४३

महोदय,

**श्री. राजहंस सिंह** , विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सुचनेची प्रत सोबत जोडली आहे. आपणास विनंती आहे की, सदर लक्षवेधी सुचनेबाबत स्वयंपूर्ण माहिती पुरक टिप्पणीसह शासनास archana.sawardekar@gmail.com या ई-मेल वर आजच/तात्काळ उलटटपाली पाठविण्यात यावी, ही विनंती.

आपला ,
(स्वाक्षरी)
(प्रविणकुमार पवार)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र:- वरीलप्रमाणे

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित.
१. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
२. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
३. कुलसचिव, कवि कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक
४. निवडस्ती

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक-४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२
दूरध्वनी क्र ०२२-२२७९३१७१
Email ID : archana.sawardekar@nic.in

क्रमांक: बैठक-२०२१/प्र.क्र. १३७/विशि-३ दिनांक :- ३० जून, २०२१.

प्रति,

मा.कुलगुरु,
सर्व अकृषी विद्यापीठे

विषयः- कोव्हिड-१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनांच्या अनुषंगाने दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयी मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२८ जून, २०२१ रोजीच्या बैठकीच्या अनुषंगाने, सर्व कुलगुरु यांनी दिलेल्या सहमतीनुसार, राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना खालील मुद्यांच्या अनुषंगाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत विनंती करण्यात येत आहेः-

(१) ज्या विद्यार्थी / विद्यार्थीनींचे आई/ वडील /पालक कोव्हिड- १९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अश्या विद्यार्थ्यांचे /विद्यार्थीनींचे पदवी / पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात यावे.

(२) अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

(३) प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई- कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० % सवलत देण्यात यावी.

(४) विद्यार्थ्यांव्दारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

(५) विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० % सवलत देण्यात यावी.

(६) सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षाचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

(७) विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नांही, याची दक्षता घेण्यात यावी.

आपला,

(अ. म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषितः-

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
(२) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(३) संचालक, कला शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
(४) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे

# महाराष्ट्र विधानपरिषद

## सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्प) अधिवेशन

श्री. राजहंस सिंह , वि.प.स यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 101 अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४३ पुढीलप्रमाणे आहे:-

" करोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण पूर्ण करण्याची घोषणा राज्य सरकारने केली असणे, तसा शासन निर्णय जारी करण्यात आला असणे, परंतु अशा विद्यार्थ्यांची आकडेवारीच सरकारकडे उपलब्ध नसल्याची धक्कादायक बाब उघडकिस आली असणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने २८ जून २०२१ रोजी राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरुंची बैठक घेतली असणे, ज्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे आई,वडील पालक कोविडमुळे मृत झाले असतील अशा सर्व विद्यार्थ्यांचे पदवी, पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण पूर्ण होईपर्यंतची संपूर्ण फी माफ करण्याचा निर्णय त्या बैठकित घेण्यात आला असणे, सदर शासन निर्णय जारी होवून आठ महिने झाले असणे, त्यांच्या अंमलबजावणीबाबत जाणून घेण्याकरीता स्टुडंट हेल्पिंग हँडचे अध्यक्ष यांनी माहिती अधिकार कायद्यांतर्गत उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे अर्ज केला असणे, त्यामध्ये कोरोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी मागीतली असणे, तसेच या योजनेत आतापर्यंत राज्यातील किती महाविद्यालयांनी लाभार्थी विद्यार्थ्यांना लाभ दिला, किती विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च माफ केला याचा तपशील मागितला असणे, परंतु यावर विभागाने "याबाबतीत अहवाल अद्याप अप्राप्त असल्यामुळे माहिती देणे शक्य होणार नाही" असे उत्तर दिले असणे, यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्ये मोठया प्रमाणात असंतोषाची भावना निर्माण झाली असणे, कोरोनामुळे पालक गमावलेल्या विद्यार्थ्यांचे पदव्युत्तरपर्यंतचे शिक्षण पूर्णपणे मोफत करण्याबाबत शासनाने उपाय योजना करण्याबाबत तसेच याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

क्रमांक : ३७०२४/म.वि.स./ई-2,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन मुंबई / नागपूर
दिनांक : 02 MAR 2022

लक्षवेधी सूचना
अति तात्काळ
काल मर्यादित

सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांच्याकडे आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

निदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सद्य:सत्रासाठी मा.सभापतींनी उपरोक्त लक्षवेधी सूचना वरील स्वरुपात स्वीकृत केली असून, या सूचनेवरील मा.मंत्री महोदयांच्या निवेदनाच्या 250 प्रती तात्काळ या सचिवालयाकडे पाठविण्यात याव्यात.

या सूचनेवरील निवेदन सभागृहात केव्हा करावे लागेल ती तारीख आपणास मागाहून कळविण्यात येईल. कृपया ही बाब अति-तातडीची समजण्यात यावी.

विशि.3

आपला

कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

(1) मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री

(2) श्री. राजहंस सिंह वि.प.स. यांना माहितीसाठी सादर अग्रेषित.

टिप :- विद्यमान अधिवेशनाच्या सन व सत्र कालावधीचा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या मध्यभागी व लक्षवेधी सूचना क्रमांक निवेदनाच्या उजव्या बाजूला मोठ्या व ठळक अक्षरात लक्षवेधी सूचनेच्या निवेदन प्रतींवर छापण्यात यावा.

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांकः २अ/एडीएम/ २०२१/333

दिनांक : 10 AUG 2021

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

विषय :- कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात

संदर्भ : शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२१/ प्र.क्र.१३७/विशि-३, दिनांक ३०.६.२०२१

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, मा.मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दिनांक २८.६.२०२१ रोजीच्या बैठकीत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांना शुल्कासंदर्भाने त्यांच्या स्तरावर निर्णय घेण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. त्याबाबत सविस्तर बाबी संदर्भाधीन शासन पत्रान्वये सर्व कुलगुरू, सर्व अकृषी विद्यापीठे यांना कळविण्यात आल्या आहेत. सदर पत्र माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी आपणास पाठविण्यात येत आहे.

(प्रमोद नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई